सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

## दोन चोरांकडून पावणे चार लाखांचे १४ मोबाईल जप्त;रेल्वे पोलीसांची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) नांदेडने 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' अंतर्गत दोन स्वतंत्र कारवायांमध्ये प्रवासी मालमत्ता चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक करून ३.६९ लाख रुपये किमतीचे १४ चोरीचे मोबाईल जप्त केले.

वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त दीप चंद्र आर्य यांच्या मार्गदर्शनाखाली आरपीएफ व जीआरपीच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. छत्रपती संभाजीनगर येथे कुंदन कलानी (१९) याच्याकडून १३ मोबाईल (३.४९ लाख), तर नांदेड रेल्वे स्थानकावर अनिकेत मगरे (२१) याच्याकडून एक रिअलमी मोबाईल (२० हजार) जप्त करण्यात आला.दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी संबंधित जीआरपीच्या ताब्यात देण्यात आले आहे. प्रवाशांनी संशयास्पद हालचाल अथवा चोरीची घटना आढळल्यास रेल मदत हेल्पलाइन १३९ किंवा जवळच्या आरपीएफ/जीआरपीशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

•वर्ष २४ वे • अंक २७५ • शुक्रवार दि.३१ जुलै २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# चार मजली इमारत कोसळून ९ ठार

## मुख्यमंत्र्यांकडून दोषींवर कठोर कारवाईचे निर्देश;भिवंडीतील घटना



भिवंडी: भिवंडी जवळ असलेल्या नारपोली भंडारी चौक परिसरातील गंगाराम वाडी येथील कोहिनूर अपार्टमेंटच्या तळ अधिक चार मजली इमारतीच्या बी-विंगचा भाग गुरुवारी (३० जुलै) रात्री अचानक कोसळून ९ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. ढिगाऱ्याखाली आणखी काही जण अडकल्याची शक्यता असून एनडीआरएफ, टीडीआरएफ, अग्निशमन दल आणि स्थानिक बचाव पथकाकडून युद्धपातळीवर मदत व शोधकार्य सुरू आहे. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची गंभीर दखल घेत दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरात धोकादायक इमारतींकडे होणाऱ्या दुर्लक्षाची भीषण किंमत नागरिकांना जीव गमावून चुकवावी लागली. या दुर्घटनेची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या कुंबीयांप्रती शोक व्यक्त करत दुर्घटनेप्रकरणी तातडीने गुन्हा दाखल करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिले आहेत. विशेष म्हणजे, संबंधित इमारत धोकादायक घोषित करून भिवंडी महापालिकेने तीन वेळा नोटिसा बजावल्या होत्या. गुरुवारी रात्री इमारत एका बाजूला झुकू लागल्याने काही रहिवाशांना बाहेर काढण्यात आले; मात्र काही जण इमारतीतच राहिल्याने इमारत कोसळताच ते ढिगाऱ्याखाली अडकले. दुर्घटनास्थळी यंत्रसामग्री पोहोचविण्यासाठी जागा नसल्याने बाजूच्या बैठ्या चाळी पाडून मार्ग तयार करण्यात आला. त्यानंतर जेसीबी व पोकलेनच्या सहाय्याने बचावकार्याला वेग देण्यात आला. ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, आ.महेश चौघुले, महापौर नारायण चौधरी तसेच वरिष्ठ अधिकारी पान ४ वर

## राज्य सरकारचे सुप्रिम कोर्टात शपथपत्र

# नांदेडसह राज्यातील २० जि.प.च्या निवडणुका डिसेंबरमध्ये

मुंबई/प्रतिनिधी-राज्यभरात नांदेड जिल्हा परिषदेसह रखडलेल्या २० जिल्हा परिषद आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका यंदाच्या डिसेंबर महिन्यात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ५० टक्के आरक्षणाची घटनात्मक मर्यादा पाळून निवडणुका घेण्याची तयारी दर्शविल्याने या प्रक्रियेला गती मिळण्याची चिन्हे आहेत.

आरक्षणाच्या टक्केवारी संदर्भातील वादामुळे या २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका दीर्घकाळ प्रलंबित राहिल्या आहेत. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने कोणत्याही परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील एकूण आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असू शकत नसल्याचे पुन्हा स्पष्ट केले आहे. तसेच, न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावण्यात आल्याचेही खंडपीठाने नमूद केले. सुनावणी दरम्यान राज्य सरकारने न्यायालयाला सांगितले की, राज्यातील



महापालिका, नगरपालिका आणि बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्या असून केवळ २० जिल्हा परिषद आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका बाकी आहेत. या निवडणुकांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आली असली तरी आरक्षणासंदर्भातील प्रलंबित मुद्द्यांवर अंतिम निर्णय होणे आवश्यक असल्याचे सरकारने स्पष्ट केले.यावेळी ओबीसी समाजाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ इंदिरा जयसिंग यांनी न्यायालयात मांडणी करताना, अनेक ठिकाणी २७ टक्के ओबीसी आरक्षणासह निवडणुका झाल्या असल्याने उर्वरित निवडणुकाही त्याच पद्धतीने घ्याव्यात, अशी भूमिका मांडली. अनुसूचित जमातींची लोकसंख्या अधिक असलेल्या काही भागांत ओबीसींसाठी एकही जागा उपलब्ध राहत नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. राज्य सरकारने यावर उत्तर देताना, ओबीसींसाठी शून्य आरक्षणाची परिस्थिती केवळ दोन-तीन जिल्ह्यांपुरती मर्यादित असल्याचे सांगितले. तर, राजकीय आरक्षणाचा समतोल राखण्यावर भर देत संबंधित मुद्द्यांवर न्यायालयाने सविस्तर सुनावणी केली.राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयाला कळविले की, मतदारयादीची विशेष सखोल पुनर्तपासणी ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असून कर्मचारीवर्ग या प्रक्रियेत व्यस्त आहे. त्यामुळे तातडीने निवडणुका घेणे शक्य नसल्याचे आयोगाने सांगितले. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित निवडणुका फेब्रुवारी किंवा मार्चपर्यंत पुढे ढकलणे योग्य ठरणार नसल्याचे स्पष्ट करत आवश्यक कर्मचारी व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. यामध्ये कोकणातील ठाणे, पालघर, उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, मराठवाडातील बीड, जालना, हिंगोली, नांदेड, विदर्भातील नागपूर, अमरावती, पान ४ वर

# रस्त्याअभावी गर्भवती महिलेची खाटेवरुन रुग्णालयाकडे धाव...

## मुखेड तालुक्यात संततधार पावसाचा फटका

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील भाटू तांडा येथे रस्त्याअभावी एका गर्भवती महिलेला उपचारासाठी चक्क बाज (खाट) वरून उचलून रुग्णालयात नेण्याची वेळ ग्रामस्थांवर आली. काल दि. ३० रोजी संततधार पावसामुळे तांड्याकडे जाणारा पायवाट रस्ता चिखलमय होऊन पाण्याखाली गेल्याने वाहनांचा संपर्क तुटला. या घटनेमुळे परिसरातील रस्ते व इतर मूलभूत सुविधांचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित गर्भवती महिलेला तातडीने उपचाराची आवश्यकता होती. मात्र, तांड्याकडे जाणारा रस्ता पावसामुळे पूर्णतः चिखलमय झाला होता. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने रुग्णवाहिका किंवा इतर कोणतेही वाहन तांड्यापर्यंत पोहोचू शकले नाही. अशा बिकट परिस्थितीत ग्रामस्थांनी धाडस दाखवत महिलेला बाज (खाट) वर ठेवून उचलत चिखल व पाण्यातून मोठी कसरत करत बाहेर काढले. त्यानंतर तिला मुखेड येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.गर्भवती महिलेला उपचारासाठी खाटेवरून वाहून न्यावे लागल्याची घटना अत्यंत गंभीर असून, ग्रामीण भागातील आरोग्यसेवा व दळणवळणाच्या सुविधांबाबत अनेक प्रश्न उपस्थित करणारी आहे. पावसाळ्यात तांड्याचा



बाहेरील गावांशी संपर्क तुटत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.दरम्यान, भाटू तांड्यातील शाळकरी विद्यार्थ्यांचीही अवस्था चिंताजनक पान ४ वर

# कारवायांतील भेदभावाबद्दल एफडीएला उच्च न्यायालयाच्या कानपिचक्या

मुंबई/प्रतिनिधी-खासगी हॉटेल्सचे परवाने निलंबित केले जात असताना मंत्रालयातील कॅन्टीनला केवळ सुधारणा करण्याची नोटीस देण्यात आल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने अन्न व औषध प्रशासन (एफडीए)वर शुक्रवारी ताशेरे ओढले. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे. खासगी आस्थापनांप्रमाणेच शासकीय व निमशासकीय उपहारगृहांवरही समान निकषांनुसार कारवाई झाली पाहिजे, असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले.

राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत सुरु असलेल्या कठोर कारवायां संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. यावेळी एफडीएने मंत्रालय आणि मुंबई उच्च न्यायालयातील उपहारगृहांच्या तपासणीचा अहवाल सादर केला. मंत्रालयातील उपहारगृहाने अन्न सुरक्षा नियमांचे तब्बल ९८ टक्के पालन केल्याचा दावा या अहवालात करण्यात आला होता. मात्र या अहवालाच्या विश्वासार्हतेवर न्यायालयाने शंका व्यक्त केली.त्यानंतर न्यायालयाने काही वकिलांना अधिकाऱ्यांसमवेत मंत्रालयातील उपहारगृहाची प्रत्यक्ष पाहणी करून दुपारी तीनपर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. पाहणीनंतर वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, आम्ही पोहोचण्यापूर्वीच उपहारगृहात मोठ्या प्रमाणावर स्वच्छता करण्यात आली होती. तरीही अनेक त्रुटी आढळून आल्या. उपहारगृहाचा परवाना दर्शविणारी प्रतही ठिकाणी लावलेली नव्हती.वकिलांनी आणखी एक गंभीर बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. मंत्रालयातील एवढ्या मोठ्या उपहारगृहाची तपासणी एफडीएने अवघ्या अर्ध्या तासात पूर्ण केली, तर खासगी हॉटेल्सच्या तपासणीसाठी पाच ते सात तास खर्च करण्यात आले. या दुहेरी निकषांवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.खंडपीठाने एफडीएला सुनावताना म्हटले की, खासगी आस्थापनांमध्ये गंभीर त्रुटी आढळल्यास थेट परवाना निलंबित केला जातो.



गेल्या अनेक दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने जिल्ह्यात मागील तीन दिवसांपासून दमदार सुरुवात केली आहे. या पावसामुळे अनेक भागातील नदी, नाले ओसंडून वाहत असल्याचे पहावयास मिळत असून किनवट तालुक्यातील सहस्त्रकुंड धबधब्याच्या ३० ते ४० फुटावरुन कोसळणाऱ्या धारा या आता पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

# असर्जन-मार्कंड नदी घाटावर पोलीसांचा छापा; ३ कोटी ६४ लाखांचा ऐवज जप्त

नांदेड/प्रतिनिधी-असर्जन ते मार्कंड शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी गुरुवारी नांदेड ग्रामीण पोलीसांच्या पथकाने छापा टाकुन ३ कोटी ६४ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी बारा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

असर्जन व मार्कंड शिवारातील नदीच्या पात्रातून रेतीचा उपसा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर, फौजदार व्यंकट कुसमे, फौजदार बापूराव चव्हाण व पोलीस कर्मचाऱ्यांनी गुरुवारी रेती घाटांवर छापा टाकला. पोलीसांची चाहूल लागताच नदी पात्रातून रेती उपसा करणारे पळून गेले आहेत. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन पाण्यात तरंगणारे २११ तराफे, पंधरा इंजीन, दहा मोठ्या लोखंडी बोटी, पाच लोखंडी बोटी, १६० ब्रास रेतीचा साठा व इतर साहित्य असा ३ कोटी ६४ लाख



रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीसांनी पंचासमक्ष तराफे, लोखंडी इंजीन व बोटी जाळून जागेवरच नष्ट केल्या आहेत. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात नारायण बाबुराव पुंड, विठ्ठल दशरथ डक, गोविंद बालाजी डक रा.पिंपळगाव, सचिन क्षीरसागर रा.कल्याण, गंगाधर मेथेवाड, चंद्रकांत कामाजी लाकडे व इतर पाच ते सहा अनोळखी इसम यांच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चंदा चोरीवर विरोधकांचे संसदेत अनोखे आंदोलन

## पुजाऱ्याच्या वेशात नाट्य सादर


नवी दिल्ली:संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विविध मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सुरू असलेल्या संघर्षात शुक्रवारी आणखी एका अनोख्या आंदोलनाची भर पडली. कथित 'चंदा चोरी' प्रकरणावरून विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात पुजाऱ्याच्या वेशभूषेत आणि दानपात्राचे प्रतीकात्मक प्रदर्शन करत सरकारविरोधात लक्षवेधी आंदोलन केले. या अनोख्या आंदोलनामुळे संसद परिसरातील वातावरण काही काळ चांगलेच तापले.

आंदोलनादरम्यान काही खासदारांनी पुजाऱ्याचा पोशाख परिधान केला होता, तर त्यांच्या हातात दानपात्र आणि विविध घोषणांनी सजलेले फलक होते. प्रतीकात्मक नाट्य सादर करत त्यांनी सरकारवर राजकीय निधी संकलनात कथित गैरव्यवहार केल्याचा आरोप केला. या नाट्याच्या माध्यमातून जनतेच्या पैशांचा आणि देणग्यांचा गैरवापर झाल्याचा आरोप विरोधकांनी मांडला.या आंदोलनात काँग्रेससह इंडिया आघाडीतील विविध पक्षांचे खासदार सहभागी झाले होते. त्यांनी संसद परिसरात एकत्र येत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. चंदा चोरी बंद करा, लोकशाही वाचवा, जनतेच्या पैशांचा हिशेब द्या अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. विरोधकांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली.विरोधी पक्षांच्या नेत्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सरकारवर गंभीर आरोप केले.

# रस्ते खचले की,व्यवस्था?

**नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयासमोरील रस्त्यावर गुरुवारी घडलेली घटना हा केवळ एक अपघात नव्हता, तर नांदेडच्या ढासळलेल्या नागरी व्यवस्थेचा आरसा होता. प्रा.चंद्रशेखर एगडे यांची कार चालत्या अवस्थेत अचानक रस्ता खचून खड्ड्यात रुतली. त्यांच्या प्रसंगावधानामुळे ते सुखरूप बचावले; अन्यथा आज हा विषय एका दुर्दैवी मृत्यूच्या बातमीचा असता. प्रश्न एवढाच आहे की, अशा घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार आहे का? रस्ता अचानक खचतो म्हणजे तो एका दिवसात खचलेला नसतो. त्यामागे वर्षानुवर्षांचा निष्काळजीपणा, निकृष्ट कामे, दर्जाहीन देखरेख आणि प्रशासनाची बेफिकिरी दडलेली असते. रस्त्याखाली पोकळी निर्माण होईपर्यंत कोणत्याही विभागाला त्याची कल्पना नसते, हे मान्य करायचे का? नागरिकांनी भरलेला कर नेमका कुठे खर्च होतो?, हा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे.नांदेड शहरातील परिस्थिती कोणापासून लपून राहिलेली नाही. अनेक भागांत घाणीचे साम्राज्य पसरले आहे. उघडी गटारे, तुटलेले रस्ते, खोदकाम करून तसेच सोडलेले मार्ग, पावसात साचणारे पाणी आणि वाहतुकीची दिवसेंदिवस बिकट होत जाणारी अवस्था हेच शहराचे वास्तव आहे. विकासाच्या मोठमोठ्या घोषणा होतात; मात्र नागरिकांना मिळतो तो धुळीचा, चिखलाचा आणि जीवघेण्या रस्त्यांचा वारसा. वाहतूक व्यवस्थेच्या नावाखाली गोरगरीब फेरीवाल्यांवर कारवाई करण्याचा देखावा केला जातो. पण शहरातील मोठमोठ्या व्यावसायिक संकुलांनी पार्किंगची व्यवस्था केली आहे का, याची चौकशी करण्याचे धाडस प्रशासन दाखवत नाही. परिणामी रस्तेच पार्किंगमध्ये बदलतात आणि वाहतूक कोंडी हा नागरिकांच्या नशिबाचा भाग बनतो. नियम केवळ दुर्बलांसाठी आणि सवलती केवळ प्रभावशालींसाठी, अशी व्यवस्था लोकशाहीला शोभणारी नाही.याहून गंभीर बाब म्हणजे नैसर्गिक नाल्यांवर झालेली अतिक्रमणे. पावसाचे पाणी वाहून नेणारे मार्ग बुजवून त्यावर इमारती उभ्या राहिल्या. त्या बांधकामांना परवानगी कोणी दिली? नियमांचे उल्लंघन झाले असेल तर जबाबदार कोण? या प्रश्नांची उत्तरे आजपर्यंत मिळालेली नाहीत. परिणामी पावसात पाणी तुंबते, रस्ते खचतात आणि नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू राहतो. महापालिकेत स्पष्ट बहुमताने सत्ता देताना नांदेडकरांनी विकासाचे स्वप्न पाहिले होते. जनतेने विश्वासाने मत दिले, अपेक्षा व्यक्त केल्या आणि शहर बदलण्याची जबाबदारी निवडून दिलेल्या नेतृत्वावर सोपवली. मग आज हे नेतृत्व गप्प का आहे? प्रत्येक वेळी एखादी दुर्घटना घडल्यानंतर घटनास्थळी भेट देणे, चौकशीचे आदेश देणे आणि दोषींवर कारवाईची घोषणा करणे, एवढ्यावरच जबाबदारी संपते का? नागरिकांना घोषणांची नव्हे, तर परिणामांची गरज आहे. आज आवश्यकता आहे ती संपूर्ण शहरातील रस्ते, भूमिगत जलवाहिन्या, गटार व्यवस्था, नैसर्गिक नाले, बांधकाम परवानग्या आणि निकृष्ट कामांची स्वतंत्र, निष्पक्ष व तांत्रिक चौकशी करण्याची. दोषी अधिकारी, ठेकेदार आणि संबंधितांवर कठोर कारवाई झाली नाही तर अशा घटना पुन्हा घडत राहतील. प्रत्येक पावसाळ्यात नांदेडकरांनी जीव मुठीत धरून प्रवास करायचा का? प्रा. एगडे यांचा जीव वाचला, हे त्यांचे भाग्य. पण प्रत्येक वेळी नशीब साथ देईल, याची कोण हमी देणार? उद्या एखाद्या शाळेची बस, रुग्णवाहिका किंवा दुचाकीस्वार अशाच खड्ड्यात गेला, तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार? नांदेडला स्मार्ट शहराचे नव्हे, तर सुरक्षित शहराचे स्वप्न हवे आहे. विकासाचा अर्थ फलक, भूमिपूजन आणि उद्घाटने नसतो; विकासाचा अर्थ सुरक्षित रस्ते, स्वच्छ परिसर, सक्षम वाहतूक व्यवस्था आणि जबाबदार प्रशासन असतो. आज नांदेडकरांच्या मनात एकच प्रश्न घुमत आहे, रस्ते खचत आहेत की व्यवस्था? या प्रश्नाचे उत्तर आता भाषणातून नव्हे, तर कृतीतून द्यावे लागेल. अन्यथा इतिहास या काळाची नोंद ''विकासाच्या गजरात ढासळलेले शहर'' अशीच करेल.**

# तुकाराम मुंडेंसारखे निर्भीड अधिकारी प्रत्येक जिल्ह्यात हवेत; कारण भ्रष्टाचारमुक्त व्यवस्थेशिवाय देशाचा विकास अशक्य



आज देशाच्या विकासाबाबत मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. नवीन योजना जाहीर होतात, कोट्यवधी रुपयांची विकासकामे मंजूर होतात आणि शासन जनतेच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा दावा केला जातो. परंतु सामान्य नागरिक म्हणून प्रत्यक्ष अनुभव वेगळाच आहे. शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा, वीज, महसूल, पोलीस, न्यायव्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, धार्मिक संस्था आणि राजकारण अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराची पाळेमुळे इतकी खोलवर रुजली आहेत की प्रामाणिक नागरिक हतबल झाला आहे. अशा परिस्थितीत नियमांचे काटेकोर पालन करणारे, निर्भीड आणि जनहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे अधिकारी समाजाला आशेचा किरण वाटतात. त्यामुळेच तुकाराम मुंडे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांविषयी जनतेमध्ये विशेष आदर आणि अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

तुकाराम मुंडे यांनी शिक्षण क्षेत्रातील अनियमितता, शाळांमधील निकृष्ट दर्जाचा आहार, विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या बाबी आणि शाळांच्या परिसरातील बेकायदेशीर विक्री याकडे लक्ष दिले, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. शिक्षण हा देशाच्या भविष्यासाठी सर्वात महत्त्वाचा पाया आहे. परंतु अनेक ठिकाणी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिला जाणारा पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येतात. याची कठोर चौकशी होऊन दोषींवर कारवाई होणे आवश्यक आहे.शाळांच्या परिसरात तंबाखू, गुटखा, सुगंधी तंबाखू, विविध प्रकारच्या गोवा पुड्या आणि आरोग्यास अपायकारक खाद्यपदार्थांची विक्री आजही सुरू असल्याचे चित्र दिसते. कायद्यानुसार शाळांच्या परिसरात अशा पदार्थांची विक्री बंद असली तरी अनेक ठिकाणी त्याची उघडपणे पायमल्ली केली जाते. काही विद्यार्थी स्वतःही अशा व्यसनांच्या आहारी जात असल्याचे वास्तव चिंताजनक आहे. भविष्यातील पिढी व्यसनाधीन झाली तर देशाचे भविष्य धोक्यात येईल. त्यामुळे या विषयाकडे केवळ प्रशासनाने नव्हे तर पालक, शिक्षक आणि समाजानेही गांभीर्याने पाहिले पाहिजे.

आज भ्रष्टाचार हा एखाद्या एका खात्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. शासनाच्या अनेक विभागांत भ्रष्टाचाराचे जाळे पसरले आहे. फाईल हलवण्यासाठी पैसे, मंजुरीसाठी पैसे, प्रमाणपत्रासाठी पैसे, अनुदानासाठी पैसे अशी परिस्थिती सामान्य नागरिक अनुभवत आहे. नियम पाळणाऱ्या नागरिकालाच जास्त त्रास सहन करावा लागतो, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.भ्रष्टाचार ही केवळ आर्थिक समस्या नसून ती नैतिक अधःपतनाची सुरुवात आहे. जेव्हा प्रामाणिकपणापेक्षा पैशाला महत्त्व दिले जाते, तेव्हा व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कमी होतो. त्यामुळे भ्रष्टाचाराविरुद्ध केवळ घोषणा न करता कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई झाली पाहिजे.कोणताही अधिकारी कितीही प्रामाणिक असला तरी त्याला शासन, लोकप्रतिनिधी आणि समाजाचा पाठिंबा मिळाला नाही तर त्याचे काम कठीण होते. अनेक अधिकारी चांगले काम करण्याची इच्छा बाळगतात; परंतु राजकीय हस्तक्षेप, दबाव, बदल्यांची भीती आणि विविध स्वार्थी गटांमुळे त्यांना मोकळेपणाने काम करता येत नाही.

देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा मुख्यमंत्री एकट्याने संपूर्ण व्यवस्था बदलू शकत नाही. त्यासाठी मंत्रिमंडळ, आमदार, खासदार, प्रशासन, माध्यमे आणि सर्वसामान्य नागरिक यांचे सहकार्य आवश्यक आहे. विकास ही सामूहिक जबाबदारी आहे.लोकशाहीमध्ये माध्यमांना चौथा स्तंभ म्हटले जाते. समाजातील चांगल्या आणि वाईट दोन्ही गोष्टी जनतेसमोर आणण्याची जबाबदारी माध्यमांची असते. काही वृत्तपत्रे आणि पत्रकार आजही निःपक्षपातीपणे जनहिताची बाजू मांडतात, ही समाधानाची बाब आहे. मात्र काही माध्यमांवर पक्षीय भूमिका, टीआरपीची स्पर्धा आणि जाहिरातींचा प्रभाव वाढत असल्याची टीका वारंवार होत असते.पत्रकारितेचा उद्देश केवळ सनसनाटी निर्माण करणे नसून सत्य जनतेसमोर मांडणे हा असला पाहिजे. सत्ताधारी असोत किंवा विरोधक, चुकीच्या गोष्टींवर समान निकषाने टीका करण्याचे धैर्य माध्यमांनी दाखवले पाहिजे.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णाला सर्वप्रथम चांगल्या रस्त्याची गरज असते. परंतु अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था इतकी वाईट आहे की रुग्ण रुग्णालयात पोहोचेपर्यंत त्याची प्रकृती अधिक गंभीर होण्याची शक्यता निर्माण होते. खड्डेमय रस्ते, वाहतुकीची कोंडी आणि निकृष्ट दर्जाची सार्वजनिक कामे यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत.आरोग्य सेवा ही नफा कमावण्याचे साधन नसून समाजसेवेचे माध्यम असले पाहिजे. रुग्णालये, औषध दुकाने, तपासणी केंद्रे आणि संबंधित सर्व यंत्रणांमध्ये पारदर्शकता आवश्यक आहे. सामान्य नागरिक आर्थिकदृष्ट्या आधीच अडचणीत असतो; त्याच्यावर अनावश्यक आर्थिक भार टाकणे योग्य नाही.रस्ते, पाणी आणि वीज या प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत गरजा आहेत. तरीही अनेक शहरांमध्ये आणि गावांमध्ये खराब रस्ते, अशुद्ध पाणी आणि अनियमित वीजपुरवठा ही मोठी समस्या आहे. पिण्याचे शुद्ध पाणी वेळेवर मिळाले पाहिजे. वीजपुरवठा नियमित असला पाहिजे. ज्या नागरिकांकडून नियमित वीजबिल वसूल केले जाते, त्यांना दर्जेदार सेवा देणे ही वीज वितरण संस्थांची जबाबदारी आहे.

अनेकदा तक्रारी करूनही त्याची दखल घेतली जात नाही. अधिकारी आणि कर्मचारी जनतेपुढे उत्तरदायी असले पाहिजेत. प्रत्येक तक्रारीवर वेळेत कार्यवाही झाली पाहिजे.नागरिक निवडणुकीत मतदान करून नगरसेवक, आमदार आणि खासदार निवडून देतात. परंतु निवडून आल्यानंतर अनेक लोकप्रतिनिधी मतदारांशी संपर्क ठेवत नाहीत, अशी जनतेची भावना आहे. निवडणुकीपूर्वी अनेक आश्वासने दिली जातात; पण निवडणुकीनंतर त्यांचा विसर पडतो.लोकप्रतिनिधींनी नियमित जनतेच्या भेटी घ्याव्यात, कामांचा हिशेब द्यावा आणि सार्वजनिक निधीचा पारदर्शक वापर करावा. लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून सतत उत्तरदायित्वाची प्रक्रिया आहे.आज अनेक ठिकाणी शिक्षण हा सेवाभावाचा विषय न राहता व्यवसाय बनत चालला आहे. काही कोचिंग क्लासेस विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेपेक्षा जाहिरातींवर अधिक भर देतात. शाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याऐवजी खासगी शिकवणींवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

शाळा सक्षम झाल्या, शिक्षकांनी दर्जेदार अध्यापन केले आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले, तर महागड्या कोचिंग क्लासेसची गरज मोठ्या प्रमाणात कमी होईल. शिक्षणामध्ये प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता या दोन गोष्टींना सर्वोच्च स्थान मिळाले पाहिजे.आजची मुले म्हणजे उद्याचा भारत. त्यांना चांगले शिक्षण, उत्तम संस्कार, शिस्त, देशप्रेम आणि सामाजिक जबाबदारी यांचे शिक्षण देणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. व्यसनमुक्त, सुसंस्कृत आणि सक्षम युवक घडले तर देश आपोआप मजबूत होईल.राष्ट्रीय सुरक्षेचे महत्त्वही वाढत आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीत तरुणांनी देशसेवा, शिस्त आणि राष्ट्रप्रेमाची भावना जोपासली पाहिजे.धर्म हा श्रद्धेचा विषय आहे; परंतु श्रद्धेच्या नावाखाली आर्थिक गैरव्यवहार होऊ नयेत. मंदिरे, मठ, ट्रस्ट आणि धार्मिक संस्थांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता असली पाहिजे. भाविकांचा पैसा हा समाजहितासाठी वापरला गेला पाहिजे.धर्म लोकांना जोडण्यासाठी आहे, विभागण्यासाठी नाही. श्रद्धेचा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे.

देशात अनेक गुन्हे आणि न्यायालयीन प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. विलंबाने मिळणारा न्याय हा अनेकदा अन्यायासमान ठरतो. गंभीर गुन्ह्यांतील खटल्यांचा जलद निपटारा करण्यासाठी विशेष न्यायालये आणि अतिरिक्त न्यायाधीशांची नियुक्ती करण्याची गरज आहे.गुन्हेगारांना वेळेत शिक्षा झाली तर गुन्हे करण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. त्याचबरोबर निरपराध व्यक्तींनाही वेळेत न्याय मिळेल.तुकाराम मुंडे यांच्यासारखे अधिकारी जनतेच्या अपेक्षांचे प्रतीक बनले आहेत. कारण ते नियम सर्वांसाठी समान असावेत, या तत्त्वावर काम करतात. अशा अधिकाऱ्यांना संरक्षण, स्वायत्तता आणि राजकीय पाठबळ मिळाले तर प्रशासन अधिक परिणामकारक होईल.प्रत्येक जिल्ह्यात प्रामाणिक, निर्भीड आणि जनहितासाठी झटणारे अधिकारी असतील तर अनेक समस्या आपोआप कमी होतील. विकासासाठी निधी महत्त्वाचा आहे; परंतु त्याहून अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या निधीचा प्रामाणिक वापर.

देशाचा विकास केवळ मोठमोठ्या घोषणा, भाषणे किंवा योजनांनी होणार नाही. त्यासाठी प्रामाणिक प्रशासन, जबाबदार लोकप्रतिनिधी, निःपक्षपाती माध्यमे, सजग नागरिक आणि पारदर्शक व्यवस्था आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य, पाणी, वीज, रस्ते, न्यायव्यवस्था आणि धर्मक्षेत्र या सर्व ठिकाणी प्रामाणिकपणा आणि उत्तरदायित्व निर्माण झाले तर भारत खऱ्या अर्थाने विकसित राष्ट्र होऊ शकतो.

आज गरज आहे ती व्यक्तिपूजेची नाही, तर तत्त्वनिष्ठ प्रशासनाची. तुकाराम मुंडे यांच्यासारखे अधिकारी प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत झाले, त्यांना राजकीय हस्तक्षेपापासून संरक्षण मिळाले आणि समाजानेही अशा अधिकाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार केला, तर भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि जनतेच्या हिताचे शासन निर्माण होऊ शकते. देशाचे भविष्य आपल्या मुलांच्या हातात आहे. त्यांना चांगले शिक्षण, सुरक्षित वातावरण, प्रामाणिक व्यवस्था आणि न्यायपूर्ण समाज देणे हीच खरी राष्ट्रसेवा ठरेल.

# निसर्गाची मुक्त उधळण;मात्र पर्यटन विकासाची गाडी धक्के खातच

## माहूरला पर्यटनाची जोड मिळाल्यास स्थानिक रोजगारालाही चालना

माहूर/प्रतिनिधी-तीर्थक्षेत्र म्हणून जगभरात ओळख असलेल्या माहूरला निसर्गानेही भरभरून दिले आहे. धार्मिक पर्यटनासोबतच ऐतिहासिक, निसर्ग, ग्रामीण आणि साहसी पर्यटनाची मोठी क्षमता असतानाही माहूरच्या पर्यटन विकासाची गाडी अद्याप अपेक्षित वेगाने धावताना दिसत नाही. मंत्री, खासदार, आमदार आणि वरिष्ठ अधिकारी माहूरला भेट देताना विकासाच्या घोषणा करतात; मात्र पर्यटन विकासाच्या बाबतीत प्रत्यक्ष कृतीचा अभाव असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

जगप्रसिद्ध रेणुका देवी मंदिर, दत्त शिखर, माता अनुसया यांची पावन भूमी असलेल्या माहूरला दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक भेट देतात. या धार्मिक पर्यटनाला ऐतिहासिक आणि निसर्ग पर्यटनाची जोड दिल्यास माहूर परिसरात पर्यटनाची नवी साखळी निर्माण होऊ शकते. रेणुका देवीचे दर्शन घेतल्यानंतर रामगड किल्ला, बाबा सोनापीर दर्गा, पांडवलेणी, बौद्ध पुतळा यांसारख्या स्थळांना पर्यटक भेट देऊ शकतात. पैनगंगा नदीवरील दिगडी, हिंगणी आणि महापूर येथील बंधारे, डोंगररांगा, हिरवाई आणि जलसंपदा यामुळे माहूर परिसराला निसर्ग पर्यटनासाठी पोषक वातावरण लाभले आहे. विशेषतः पावसाळ्यात या परिसराचे रूप अधिकच खुलते. मात्र या नैसर्गिक स्थळांचा पर्यटनाच्या दृष्टीने नियोजनबद्ध विकास झालेला नाही. शेख फरीद शक्करगंज रहमतुल्लाह अलैह यांची ऐतिहासिक दरगाहही माहूरच्या पर्यटन वैभवात भर घालणारी आहे. डोंगरातील दगड कोरून तयार करण्यात आलेल्या या दरगाहीच्या परिसरातील नैसर्गिक धबधबा पावसाळ्यात पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो. सुमारे ४० ते ५० फूट उंचीवरून कोसळणाऱ्या पाण्यामुळे परिसराचे सौंदर्य खुलते. आज पर्यटनाच्या संकल्पना बदलत आहेत. शांत, निवांत वातावरणात ग्रामीण जीवनाचा अनुभव घेण्यासह निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालविण्याकडे पर्यटकांचा कल वाढत आहे. या दृष्टीने माहूरगड परिसर चिखलदरा किंवा महाबळेश्वरच्या धर्तीवर विकसित होण्याची क्षमता बाळगतो. मात्र त्यासाठी पायाभूत सुविधा, रस्ते, पार्किंग, स्वच्छतागृहे, माहिती केंद्रे, दिशादर्शक फलक, सुरक्षा व्यवस्था आणि निवासाच्या सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. माहूरच्या पर्यटन विकासाचा फायदा केवळ पर्यटकांनाच होणार नाही, तर स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळू शकते. हॉटेल व्यवसाय, वाहतूक, छोटे व्यावसायिक, विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी निर्माण



होऊ शकतात. स्थानिक युवकांसाठी पर्यटन हा रोजगाराचा महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो. निसर्ग, इतिहास आणि अध्यात्म यांचा अनोखा संगम असलेल्या माहूरकडे पर्यटन विकासासाठी आवश्यक असलेली बहुतांश नैसर्गिक संपदा आहे. काहीच नसलेल्या ठिकाणी पर्यटन प्रकल्प उभे राहून ती ठिकाणे नावारूपाला येत असताना माहूरसारख्या समृद्ध पर्यटनस्थळाकडे दुर्लक्ष का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. माहूरच्या पर्यटन विकासासाठी राजकीय इच्छाशक्ती, प्रशासनाचा सक्रिय सहभाग आणि ठोस नियोजनाची गरज आहे. केवळ पर्यटन विकासाच्या घोषणा न करता माहूरला स्वतंत्र पर्यटन सर्किटचा दर्जा देऊन ठोस निधी आणि कालबद्ध आराखडा तयार करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# पोर्टलवरील कर्जमाफीची रक्कमच अंतिम ;शेतकऱ्यांनी संभ्रम बाळगू नये-जिल्हाधिकारी



नांदेड/प्रतिनिधी-राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या याद्यांमधील थकबाकीची रक्कम आणि योजनेच्या पोर्टलवरील रक्कम यात तफावत आढळल्यास शेतकऱ्यांनी कोणताही संभ्रम न बाळगता पोर्टलवर दर्शविलेली रक्कमच अंतिम व ग्राह्य मानावी, असे स्पष्ट आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) आणि ग्रीस्टॅक नोंदणी प्राधान्याने पूर्ण करावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे व विविध माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुरू केलेल्या या योजनेत कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना (ओटीएस) आणि प्रोत्साहनपर लाभ या तीन घटकांचा समावेश आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख २४ हजार कर्जखाती पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून ९९ हजार पात्र खाती प्राप्त झाली आहेत. त्यापैकी ३२ हजार खात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण वेगाने सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

व्यापारी बँकांमधील एनपीए खातेदार शेतकऱ्यांच्या गावपातळीवरील याद्यांतील थकबाकी आणि पोर्टलवरील रक्कम यामध्ये फरक असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले की, पोर्टलवरील थकबाकी ही ३१ मार्च २०२६ पर्यंतची असून तीच ग्राह्य आहे. शासनाने १ जुलै २०२६ रोजी सर्व बँकांना १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज आकारू नये असे निर्देश दिले असून सर्व बँकांनी त्यास लेखी संमती दिली आहे.शेतकऱ्यांनी पोर्टलवरील रक्कम मान्य असल्यास त्वरित आधार प्रमाणीकरण करावे. प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर मिळणाऱ्या पावतीमध्ये मंजूर कर्जमुक्तीची रक्कम नमूद असेल. त्यानंतर संबंधित लाभाची रक्कम डीबीटीद्वारे थेट कर्ज खात्यात जमा करण्यात येईल. कर्जमुक्ती पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना कर्ज बेबाकी प्रमाणपत्र देण्यात येईल तसेच लाभार्थ्यांच्या याद्या संबंधित बँक शाखा आणि विविध कार्यकारी सेवा संस्थांमध्ये प्रसिद्ध केल्या जातील. पोर्टलवरील रक्कम किंवा कर्जाच्या तपशीलाबाबत आक्षेप असल्यास शेतकऱ्यांनी योजनेच्या पोर्टलवर ग्रिव्हन्स नोंदवावी. या तक्रारींचे निराकरण जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा-स्तरीय समितीमार्फत करण्यात येणार आहे. यासाठी आपले सरकार सेवा केंद्रेही सक्रिय करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना संबंधित बँकांमार्फत खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## सात हजाराचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-मनु तांडा ता.मुखेड येथे अवैधरित्या गुटखा विक्री करणाऱ्या एका इसमास पोलीसांनी गुरुवारी अटक करुन सात हजार रुपयांचा गुटखा जप्त केला आहे.

मनु तांडा येथे बेकायदेशिररित्या गुटख्याची विक्री होत असल्याची माहिती मुक्रमाबाद पोलीसांना मिळाली. गुरुवारी सकाळी पोलीसाच्या एका पथकाने मनु तांडा येथे छापा टाकुन प्रकाश मारोती चव्हाण (वय ४०) यास अटक केली. त्याच्या जवळून सात हजार रुपयाचा गुटखा पोलीसांनी जप्त केला आहे.

## मुखेड तालुक्यात सर्वदूर पाऊस ;सूर्यदर्शनही नाही

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यात दिवसभर पावसाची संततधार सुरू असून, तालुक्यात सर्वदूर समाधानकारक पाऊस होत आहे. आकाश सतत ढगाळ राहिल्याने सूर्यदर्शनही झाले नाही. दरम्यान या पावसामुळे शेतशिवारातील पिकांना नवसंजीवनी मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुखेड शहरासह तालुक्यातील मुक्रमाबाद, येवती, बाऱ्हाळी, जाहूर, राजुरा, बेटमोगरा, चाडोळा, सावरगाव, जाब बु. आदी ग्रामीण भागात अधूनमधून जोरदार, तर काही ठिकाणी रिमझिम पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे शेतांमध्ये पुरेसा ओलावा निर्माण झाला असून, खरीप पिकांच्या वाढीस पोषक वातावरण तयार झाले आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद तसेच इतर पिकांना या पावसाचा मोठा फायदा होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. या पावसामुळे नद्या, नाले व ओढ्यांमध्ये पाण्याचा प्रवाह वाढला असून, शेततळी व लहान जलस्रोतांमध्येही पाणीसाठा होण्यास सुरुवात झाली आहे. भूजलपातळी वाढण्यास मदत होणार असल्याने आगामी काळात पाणी टंचाईची तीव्रता कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सतत ढगाळ वातावरण व सूर्यप्रकाशाचा अभाव यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला असला तरी काही ठिकाणी पावसामुळे रस्त्यांवर चिखल व पाणी साचल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहेत. आता पिकांची वाढ चांगली होत असल्याने शेतकरी समाधानी असून, आगामी काही दिवस पावसाचा असाच जोर कायम राहिल्यास खरीप हंगामासाठी हा पाऊस लाभदायक ठरेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

## शंभर रुपयांच्या स्टॅम्पवर झालेल्या फेरफार नोंदींची चौकशी करण्याची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर व मुखेड तालुक्यात केवळ शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवरील संमतीपत्र, बॉण्ड अथवा प्रतिज्ञापत्राच्या आधारे करण्यात आलेल्या शेती जमिनीच्या फेरफार नोंदी बेकायदेशीर असल्याचा आरोप करत अशा सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधित फेरफार नोंदींना तात्काळ स्थगिती देण्याची मागणी देगलूर येथील उपजिल्हाधिकारी यांच्याकडे वकिलांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नोंदणी अधिनियम १९०८, मालमत्ता हस्तांतरण अधिनियम १८८२ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील तरतुदींनुसार स्थावर मालमत्तेचे हक्क हस्तांतरण केवळ वैध नोंदणीकृत दस्तऐवज अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशावरच होणे आवश्यक आहे. मात्र काही ठिकाणी केवळ शंभर रुपयांच्या स्टॅम्पवरील बॉण्डच्या आधारे फेरफार मंजूर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे शासनाच्या मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्काच्या महसुलाचे नुकसान होत असून नागरिकांमध्ये भविष्यात



कायदेशीर वाद निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर व शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच महसुली नुकसानीची वसुली संबंधितांकडून करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर ॲड. रविंद्र एच. पाटील, ॲड. महेश व्ही. देशमुख, डॉ. पुष्कर सी. इंदूरकर यांच्यासह एकूण २० वकिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सायन्स कॉलेज येथे डॉ.प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

नांदेड/प्रतिनिधी-एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सायन्स कॉलेज नांदेड येथील नवनियुक्त प्राध्यापकांच्या वतीने भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजात पर्यावरण संवर्धन आणि 'हरित क्रांती'चा संदेश देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या विशेष प्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रत्येकी एक झाड लावून पर्यावरणाबद्दलची आपली सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्यात आली. या वृक्षारोपण कार्यक्रमास नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील, माजी अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, सहसचिव श्री प्रदीप नागापूरकर, प्रा. वट्टमवार सर, डॉ.बालाजी कोम्पलवार सर, सीडीसी अध्यक्ष दिपनाथ पत्की, माजी प्राचार्य डॉ.गवई, श्री प्रवीण साले, नगरसेविका शांभवी साले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मण शिंदे, उपप्राचार्य प्रा.एकनाथ खिल्लारे आणि पर्यवेक्षक प्रा. सतीश बैनवाड



यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. सदर यशस्वी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील नवनियुक्त प्राध्यापक प्रा. आकाश करंडे, प्रा. जयंत जोशी, प्रा. अक्षय वडजे, प्रा. आदिनाथ पायगन, प्रा. बापू खुरांगे, प्रा. महेश पाटील, प्रा. अंकिता वडजे, प्रा शुभांगी निलवर्ण आणि प्रा. प्रतीक्षा सुर्वे यांच्या वतीने करण्यात आले होते.

## दुचाकीवर सासरवाडीला जाणाऱ्या जावयाचा अपघाती मृत्यू

कंधार/प्रतिनिधी-कंधारकडून दुचाकीवर सासरवाडी पेठवडजला आपल्या पत्नीस भेटण्यासाठी जाणाऱ्या दुचाकीस्वार जावयाचा फुलवळ येथील पुलानजीक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वर अपघात होऊन जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि.३० जुलै रोजी गुरुवारी घडली आहे.

लोहा तालुक्यातील नगारवाडी येथील रहिवासी सचिन रावसाहेब येटलवाड वय २७ वर्षे व्यवसाय ऊसतोड कामगार हे दि.३० जुलै रोज गुरुवारी आपल्या



दुचाकी क्रमांक एम.एच. १४ ई. व्ही.१९१३ वरून पत्नीला भेटण्यासाठी सासुरवाडी पेठवडजकडे जात असताना फुलवळ येथील पुलाजवळ सदरच्या दुचाकीचा अपघात होऊन दुचाकीस्वार सचिन रावसाहेब येटलवाड यांचा जागीच मृत्यू झाला असल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.सदरच्या अपघाता बाबत कंधार पोलीस ठाण्यात भ्रमणध्वनी वरून माहिती दिली असता, घटनेचे गांभीर्य ओळखून पो.नि.अरविंद घोडके, सपोनी बालाजी गारोळे, सुनील साखरे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन सदरचे प्रेत शवविच्छेद-नासाठी ग्रामीण रुग्णालय कंधार येथे पाठविण्यात आले. मयत सचिन येटलवाड यांचे पश्चात पत्नी, आई, भाऊ असा परिवार आहे.

## महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समिती दौऱ्याच्या पूर्वतयारीचा आढावा

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीचा नांदेड जिल्हा दौरा येत्या १० ते १२ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्याच्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदिप गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन येथे बैठक संपन्न झाली. बैठकीस किनवटचे सहायक जिल्हाधिकारी तथा आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी बी. सरवनन, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह महसूल, जिल्हा परिषद, पोलीस, मनपा, सार्वजनिक बांधकाम, कृषी, क्रीडा, महावितरण, जलसंपदा, वन विभाग, पुशसंवर्धन, राज्य उत्पादन शुल्क आदी संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदिप गायकवाड यांनी समितीच्या दौऱ्याचे स्वरूप, समितीचे अधिकार तसेच संबंधित विभागांनी आवश्यक माहिती व कार्यवाहीसह बैठकीस उपस्थित राहण्याबाबत मार्गदर्शन केले.

## कलांगण प्रतिष्ठानच्यावतीने उद्या जज्बात गझल गायनाची अनोखी मैफल

नांदेड/प्रतिनिधी-कलांगण प्रतिष्ठान व दैनिक प्रजावाणी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, १ ऑगस्ट रोजी सायं.६.३० वा. कुसुम सभागृहात 'जज्बात... कुछ तुम्हारे, कुछ हमारे... एक सुहानी शाम, गझलों के नाम' या बहारदार गझल मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदी व मराठी चित्रपटांतील लोकप्रिय आणि गाजलेल्या गझलांचा सुरेल आस्वाद या कार्यक्रमातून रसिकांना घेता येणार आहे.

या मैफिलीत प्रख्यात गझल गायिका वर्षा जोशी आणि प्रसिद्ध गझल गायक वैभव पांडे आपल्या मधुर गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. त्यांना सारंगीवर संदीप मिश्रा, तबल्यावर आदित्य पांडे आणि कीबोर्डवर शौनक जपे यांची साथ लाभणार आहे. कार्यक्रमाची संकल्पना ॲड. गजानन पिंपरखेडे यांची असून निर्मितीची जबाबदारी अध्यक्ष रमेश मेगदे यांनी सांभाळली आहे. प्रसिद्ध निवेदक व गझलकार बापू दासरी यांच्या अभ्यासपूर्ण आणि अनोख्या शैलीतील निवेदनामुळे कार्यक्रमाची रंगत अधिक खुलणार आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटन नांदेड-वाघाळा महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते होणार असून, प्रमुख अतिथी म्हणून हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अरुण मान्नीकर आणि मणका विकारतज्ज्ञ डॉ. उमेश कानडे उपस्थित राहणार आहेत. कलांगण प्रतिष्ठानच्या वार्षिक सदस्यांसाठी आयोजित करण्यात आलेला हा चौथा सांस्कृतिक कार्यक्रम असून, 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर आसनव्यवस्था करण्यात आली आहे. तरी उद्या होणाऱ्या सुरेल गझल मैफिलीचा रसिकांनी आनंद घ्यावा, असे आवाहन दैनिक प्रजावाणीचे संपादक शंतनु डोईफोडे आणि कलांगण प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.


### जाहीर प्रगटन

मे.दुसरे सह-दिवाणी न्यायाधीश क.स्तर कंधार यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२७२/२०२६
MHND100009542026
अर्जदारः दत्ता पि.गंगागिर गिरी वय २६ वर्षे,धंदा मजुरी,रा.बाचोटी ता.कंधार जि.नांदेड.
विरुद्ध
गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मधील कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी वरील सदरील प्रकरणातील अर्जदार यांचे वडिल नामे गंगागीर मोहन गिरी हे होते ते दिनांक ०४/०२/२०२१ रोजी बाचोटी ता.कंधार येथे राहत्या घरी मयत झाले आहेत. अर्जदार यांचे म्हणने आहे की, अर्जदारा शिवाय इतर कोणीही मयताचे वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांनी मयत गंगागीर मोहन गिरी यांचे वारस असल्या बाबत शासकिय व निमशासकिय कामासाठी म्हणुन वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्या अर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहिर प्रगटन द्वारे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत गंगागीर मोहन गिरी यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अथवा वकिला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्यतो हुकूम पारित केला जाईल. याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०७/०९/२०२६

आज रोजी दिनांक ३०/०७/२०२६ रोजी माझ्या सहि व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**वरिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार



**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - २०/०७/२०२६
(जन्म मृत्यू शाखा)

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार जळबाजी संभाजी सोनकांबळे रा.बारुळ ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.प्रतिक सुभाष शंकपाळे रा.बारुळ ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव प्रतिक सुभाष शंकपाळे रा.बारुळ ता.कंधार या ठिकाणी दिनांक १८/०७/२००२ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १७/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- २०/०७/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - २१/०७/२०२६
(जन्म मृत्यू शाखा)

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार रमेश बळवंतराव देशमुख रा.पांगरा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.हर्षद रमेश देशमुख रा.पांगरा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव हर्षद रमेश देशमुख रा.पांगरा ता.कंधार जि.नांदेड या ठिकाणी दिनांक ०२/११/२०२३ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १७/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- २१/०७/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



### टि.सी.,मार्क मेमो व सनद हरवली

माझी बालाप्रसाद केरबा गंगोत्री या नावाची दहावी पासची मुळ टि.सी.,दहावी पासचा मार्क मुळ मेमो, मुळ सनद व इतर कागदपत्रे दिग्रस (बु) ते कंधार बसने प्रवास करत असताना कंधार बसस्थानक परिसरात हारवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्काचा पत्ता
**बालाप्रसाद केरबा गंगोत्री**
रा.दिग्रस (बु) ता.कंधार,जि.नांदेड.
मो.क्रं.९७६३३७२६३६

# पावसामुळे नुकसानीचा अहवाल सादर करण्याच्या तहसीलदारांच्या सूचना



## कंचलीच्या सेवकाचा मृतदेह २४ तासांनी सापडला

किनवट/प्रतिनिधी- कंचली येथील पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या राजू रेड्डी दंडेलू यांचा अथक प्रयत्नानंतर शेवटी ३० जुलै रोजी मृतदेह मिळाला असून शवविच्छेदन प्रक्रियेनंतर पुढील सोपस्कार पूर्ण केल्याचे वृत्त आहे.

२९ व ३० जुलै रोजी किनवट तालुक्यात झालेल्या पावसामुळे काही नुकसान झाले असेल तर पाहाणी करून तात्काळ अहवाल सादर करण्याच्या सूचना तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकरांनी ग्राम महसूल अधिकारी व मंडळाधिकाऱ्यांना दिल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

२९ आणि ३० जुलै रोजीच्या जोरदार झालेल्या पावसामुळे नदीनाल्यांना आलेल्या पूरपरिस्थितीवर तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकर दस्तुरखुद्द लक्ष ठेऊन होत्या. कंचली येथील राजू रेड्डी दंडेलू यांची एक दूर्दैवी घटना वगळता अन्यत्र कुठेही वीज पडून जनावरांची किंवा मनुष्यांची वीज पडून अथवा पुराच्या पाण्यात वाहून जीवितहानी झालेली नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे. असे असले तरी ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळाधिकाऱ्यांना परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून राहाण्याच्या सूचना दिल्या आहेत. ५५४ मि.मि.ची ३० जुलैपर्यंत पावसाची नोंद झाली असल्याचे सांगण्यात आले. दोन दिवस झालेल्या अतीपावसामुळे चिंचखेड येथील संतोष माणिकराव चव्हाण यांच्या घराची भिंत पडली. दरसांगवी (चि) येथील देविदास राजाराम नरवाडे यांच्याही घराची पडझड झालीय. हटकरखोरी (नागझरी) येथील केशव चामनर यांच्याही घराची भिंत पडली. पिंपळगाव आणि फाट्यावर पुराच्या पाण्याने कहर केला असून त्यात गरीबांचे संसार उपयोगी साहित्य होत्याचे नव्हते झाले. त्याचेही तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. शेती आणि पीकांचे नुकसान झाल्याची कुठलीही खबर मिळाली नाही. नागझरी ते झेंडीगुडा, घोटीफाटा ते मलकापूर दरम्यानच्या पुलावरून पुराचे पाणी असल्याने खेरडा, मालेगाव, बोरगाव, लक्कडकोट, सिंदगी हा मार्ग पूर ओसरेपर्यंत ठप्प झाला होता. गोकुंदा येथे एका कारवर झाड पडून नुकसान झाले. आणि बोधडी बु. येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात मुख्य रस्त्यावर झाड पडल्याने काहीकाळ वाहतूक थांबली होती.

# ई-२० मुळे वाहनातील काही भागांवर परिणाम

## नितीन गडकरींची संसदेत पहिल्यांदा कबुली

नवी दिल्ली:पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळून तयार करण्यात येणाऱ्या ई-२० पेट्रोलच्या वापरामुळे २०१६ पूर्वी उत्पादित काही वाहनांतील रबरी भागांवर परिणाम होऊ शकतो, अशी महत्त्वपूर्ण माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यसभेत लेखी उत्तराद्वारे दिली आहे. ई-२० इंधनाबाबत केंद्र सरकारने प्रथमच अधिकृतपणे अशी कबुली दिली आहे. गडकरी यांनी स्पष्ट केले की, २००५ ते २०१६ या कालावधीत तयार झालेल्या बीएस-३ मानकांच्या वाहनांमध्ये वापरण्यात आलेले काही रबरी भाग, गॅस्केट, सील्स आणि फ्युएल सिस्टीममधील घटक ई-२० इंधनाच्या संपर्कामुळे कालांतराने झिजू शकतात. मात्र, यासाठी इंजिनमध्ये कोणताही बदल करण्याची गरज नसून नियमित सर्व्हिसिंगदरम्यान हे भाग सहज बदलता येतात.राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार, इंडियन ऑइल, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम (आयआयपी), सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स (एसआयएएम) आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (एआरएआय) यांनी ई-२० इंधनावर दुचाकी व चारचाकी वाहनांचा संयुक्त अभ्यास केला.

# जन्मदात्या आईचा खून करणाऱ्या मुलास जन्मठेप

कंधार/प्रतिनिधी- नौकरीसाठी काही प्रयत्न करीत नाहीस, पैसे कमावत नाही, असे बोलल्याचा राग मनात धरून जन्मदात्या आईचा लोखंडी कत्तीने खून करणाऱ्या क्रूर मुलास कंधार न्यायालयातील जिल्हा न्यायाधीश ए. पी. कुलकर्णी यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

वाघदरवाडी (ता. लोहा) येथील बालाजी केंद्रे हे दि. २३ ऑक्टोबर २०२३ रोजी शेतात असतांना दुपारी अडीचच्या सुमारास त्यांना शेतातील आखाड्यावर त्यांची पत्नी गंगाबाई केंद्रे (वय ५०) यांच्या ओरडण्याचा आवाज आला. त्यामुळे बालाजी केंद्रे हे आखाड्यावर पाहण्यासाठी गेले. तेव्हा त्यांचा मुलगा नरसिंग केंद्रे (वय २७) याने त्याची आई गंगाबाई हिला लोखंडी कत्तीने डोक्यावर, छातीवर व इतर ठिकाणी मारहाण केल्याचे दिसले. तू माझ्या नौकरीसाठी काही प्रयत्न करीत नाहीस. मला पैसे खर्च करत नाहीस. माझे वय वाढले आहे. या गोष्टीचा राग मनात धरून नरसिंगने आईला ही मारहाण केली. त्यावेळी रक्तबंबाळ झालेल्या गंगाबाई यांना सुरवातीस तत्काळ माळाकोळी येथील सरकारी दवाखान्यात नेण्यात आले. त्यानंतर त्यांना नांदेड येथील यशोसाई हॉस्पीटल येथे दाखल केले. पण तेव्हा डॉक्टरांनी तपासून तिला मयत घोषित केले. मयत गंगाबाईचे पती बालाजी केंद्रे यांच्या फिर्यादीवरून पोलिस ठाणे माळाकोळी पोलीस ठाण्यात मुलगा नरसिंग याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणाचा तपास सपोनि. निलपत्रेवार यांनी केला. सरकार पक्षातर्फे या प्रकरणात ८ साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षाचा साक्षीपुरावा व अंतिम युक्तीवाद ग्राह्य धरून कंधारचे जिल्हा न्यायाधीश ए. पी. कुलकर्णी यांनी आरोपी नरसिंग केंद्रे यास जन्मठेपेची शिक्षा सुनावली.सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ॲड. महेश कागणे यांनी बाजू मांडली व त्यांना बी. एस. पारदे पोलीस पैरवी यांनी सहकार्य केले.




बलात्काराच्या घटनेतील आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी, तसेच शक्ती कायदा लागू करावा या मागणीसाठी निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर आज (शुक्रवार) मोर्चा काढण्यात आला होता.

# मसलगा शाळेची दुरावस्था, गळक्या छतातून वर्गात पाणी

मुखेड/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील मसलगा येथील जिल्हा परिषद शाळेची अत्यंत दुरवस्था झाली असून, पावसाचे पाणी थेट वर्गात गळत आहे. या गळक्या छतामुळे विद्यार्थ्यांच्या जिवावर बेतण्याची मोठी शक्यता निर्माण झाली असून, शाळेच्या या दयनीय अवस्थेचा संतापजनक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

शाळेच्या छतातून मोठ्या प्रमाणात पाणी गळत असल्यामुळे संपूर्ण वर्गात पाण्याचे तळे साचल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी एका हातात पाटी-पुस्तक घ्यायचे की गळणारे पाणी भरायचे? असा उद्विग्न सवाल आता उपस्थित केला जात आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये शाळेची अवस्था स्पष्टपणे दिसत असून, शिक्षणाचे पवित्र मंदिर आता विद्यार्थ्यांसाठी मृत्यूचा सापळा बनत आहे की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून दरवर्षी शाळा दुरुस्तीच्या नावावर लाखो रुपयांचा निधी खर्च केला जातो. मग हा निधी नेमका गेला कुठे? असा संतप्त सवाल ग्रामस्थ आणि पालक विचारत आहेत. उद्या जर हे जीर्ण झालेले छत कोसळून एखादी मोठी दुर्घटना घडली आणि निष्पाप विद्यार्थ्यांच्या जिवाचे बरे-वाईट झाले, तर याला जबाबदार कोण? झोपलेले प्रशासन, कुंभकर्णी झोपेत असलेला शिक्षण विभाग की स्थानिक लोकप्रतिनिधी? सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर तरी प्रशासनाला जाग येणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शिक्षण विभागाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन शाळेची त्वरित दुरुस्ती करावी, अन्यथा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संतप्त पालकांनी व ग्रामस्थांनी दिला आहे.

# पावसामुळे बारुळ-तेलूर फाटा रस्त्यांची दुरावस्था

कंधार/प्रतिनिधी- सततच्या मुसळधार पावसामुळे बारूळ ते तेलूर फाटा या मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. आधीच मोठमोठ्या खड्ड्यांनी विदीर्ण झालेल्या रस्त्यावर आता पावसाचे पाणी साचल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नसल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

या मार्गावर अनेक ठिकाणी रस्ता पाण्याखाली गेला असून वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. दुचाकीस्वार, शेतकरी, विद्यार्थी तसेच ग्रामस्थांना रोजच्या प्रवासात मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनली असून



तातडीने रस्त्याची दुरुस्ती, खड्डे बुजविणे आणि पाण्याचा योग्य निचरा करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. आधी ढीगभर खड्डे आणि त्यात आता पावसाची भर अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिक व्यक्त करत असून, प्रशासनाने याकडे त्वरित लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

# सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर माहूर पोलिसांचे मॉक ड्रिल



माहूर/प्रतिनिधी- पावसाळ्याच्या हंगामासोबतच आगामी काळात विविध धार्मिक सण व उत्सवांना सुरुवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी माहूर पोलिसांकडून शुक्रवारी मॉक ड्रिल घेण्यात आली. यावेळी पोलिसांनी चित्तथरारक प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून संभाव्य परिस्थिती हाताळण्याची रंगीत तालीम केली.

सण-उत्सवांच्या काळात मोठ्या प्रमाणावर भाविक व नागरिक एकत्र येत असल्याने काही वेळा गर्दी किंवा जमावाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. अशावेळी परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये, यासाठी पोलिस यंत्रणेला तत्परतेने निर्णय घेणे आवश्यक असते. संभाव्य अनुचित प्रकार घडल्यास कोणत्या परिस्थितीत कोणती पावले उचलायची, जमावाला कसे नियंत्रित करायचे तसेच कायदा व सुव्यवस्था कशी सुरळीत ठेवायची, याबाबत या मॉक ड्रिलच्या माध्यमातून सराव करण्यात आला.यावेळी पोलिस कर्मचाऱ्यांनी विविध परिस्थितींचे प्रात्यक्षिक सादर करत आपली सज्जता दाखवून दिली. अचानक निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर तातडीने नियंत्रण मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांचा सरावही करण्यात आला.माहूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार देविदास चोपडे यांच्या उपस्थितीत झालेल्या या मॉक ड्रिलमध्ये गोपनीय शाखेचे गजानन जाधव, होमगार्ड तसेच पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

पान १ वरुन

### चार मजली इमारत...

घटनास्थळी दाखल झाले. आतापर्यंत शमीम शेख (३२), रंजीत सिंग (४५), मिराज रसूल शेख (३४), संतोष कुमार पांडे (४२) आणि शमीम अन्सारी (३०) यांची ओळख पटली असून उर्वरित चार मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, शहरातील सर्व धोकादायक इमारती रिकाम्या करून त्यांचे वीज व पाणीपुरवठा बंद करण्यात येईल. आवश्यक असल्यास पोलीस प्रशासनाचीही मदत घेतली जाईल, असा इशारा महापौर नारायण चौधरी यांनी दिला आहे.

### राज्य सरकारचे...

चंद्रपूर, अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली या २० जिल्हा परिषदांचा समावेश आहे. न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला उर्वरित निवडणुका वेळेत घेण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, प्रशासकीय सुविधा आणि संसाधनांचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले असून, त्यानंतर निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### रस्त्याअभावी गर्भवती महिलेची...

झाली आहे. शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना पाण्यातून व चिखलमय मार्गाने जीव धोक्यात घालून वाट काढावी लागत आहे. पाण्याचा प्रवाह वाढल्यास विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती पालकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.भाटू तांड्याला सर्व ऋतूंमध्ये वाहतुकीस योग्य असा कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध करून द्यावा, पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात तसेच आरोग्य व शिक्षणाच्या दृष्टीने आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.एका गर्भवती महिलेला उपचारासाठी खाटेवरून उचलून रुग्णालयात न्यावे लागल्याची घटना प्रशासनाच्या दृष्टीने इशारा मानली जात असून, आता तरी संबंधित यंत्रणांनी तातडीने दखल घेऊन भाटू तांड्याच्या रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# राष्ट्रीय समाज पक्षाची ३ ऑगस्ट रोजी बैठक

नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रीय समाज पक्षाच्या युवा जोडो संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर दि.३ ऑगस्ट रोजी स.१० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे बैठक होणार आहे. अशी माहिती रासपचे नांदेड जिल्हाध्यक्ष शिवकुमार देवकत्ते यांनी दिली.

या बैठकीस रासपचे प्रदेश युवाध्यक्ष अजित पाटील यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी, राष्ट्रीय सचिव गोविंदराव शूरनर, प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते, प्रदेश मुख्य महासचिव ज्ञानेश्वर सलगर, राज्य कार्यकारणी सदस्य प्रा.शिवाजी इंदुरे तसेच जिल्ह्यातील रासपचे आजी, माजी जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी नवीन पद घेवून पक्षात काम करु इच्छिणारे कार्यकर्ते यांच्यासह सर्व कार्यकर्ते व पक्ष विचारधारेला मानणारे सर्व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे. या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीही केल्या जाणार आहेत. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व रासप कार्यकर्ते व पक्षात वेगवेगळ्या पदावर कार्य करण्यासाठी ईच्छुक युवा युवतींनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन नूतन जिल्हाध्यक्ष शिवकुमार देवकत्ते यांनी केले आहे.

# नित्य योग समितीच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्साहात

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड नित्य योग समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी योगाचार्य नांदेड योगरत्न भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. याप्रसंगी नांदेड योग सेवा समितीचे प्रसिध्दीप्रमुख तथा वरिष्ठ पत्रकार मकरंद पांगरकर यांनी सत्कारमूर्ती डॉ.गोविंद नांदेडे यांचा कार्य परिचय करुन दिला. यानंतर डॉ.नांदेड यांचे गुरु तुळशीराम केरले गुरुजी यांच्या अनुभव लेखनाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर सबंध आयुष्यात ३९ विविध पदव्या प्राप्त करणारे तसेच शिक्षण क्षेत्रात ३६ वर्षे सेवा देणारे आणि अनेक विद्यापीठांत सुवर्णपदकासह कारकीर्द गाजवणारे डॉ. गोविंद नांदेडे यांना समितीच्या वतीने योगाचार्य नांदेड योगरत्न भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या हस्ते विद्या विभूषण पुरस्काराने सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी यावेळी आपले मत व्यक्त केले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४